ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052 (UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

Golden Research Thoughts

डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार

डॉ. रामेश्वर मा. भिसे
प्राचार्य , जे.डी. पाटील सांगळुदकर
महाविद्यालय दर्यापुर, जि. अमरावती.



प्रस्तावना

डॉ. पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊसाहेब हे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भारताचे पहीले कृषी मंत्री म्हणुन त्यांची अनेकांना ओळख असेल पण भाऊसाहेबांना समजुन घेतांना विदर्भ, महाराष्ट्राच्या सीमात न अडकता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षितिजावरूनही त्यांना समजून घ्यावे लागेल. डॉ. पंजाबरावांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी पापळ या गावी झाला. व मृत्यु १० एप्रील .....कृषक कार्य हेच पंजाबरांचे जन्मकार्य होते. पंजाबराव जिथे जिथे गेले तिथे तिथे समाजक्रांती करीत राहिले. त्यांच्या जीवनाचा आणि जीवनकार्याचा तपशील आसेतुहिमाचल ओलांडुन दूरवर गेला आहे. भारतीय लोकसंस्कृती आणि सभ्यतेप्रमाणे डॉ. पंजाबरावांना कोणत्याही सीमा बांधूनठेऊ शकल्या नाही. समाजकारणापासून राजकारणापर्यंत, शिक्षणापासून सहकारापर्यंत, कायद्यापासून तत्वज्ञानापर्यंत आणि कृषक-क्रांतीपासून समग्र-क्रांतीपर्यंत या वेदवाङ्मयाच्या अभ्यासकाचे जीवनकार्य जाऊन पोचले आहे. पंजाबराव या व्यक्तीपेक्षा पंजाबराव हे तत्व खूप आर्काक आहे. आजच्या आणि उद्याच्या भारताला अशी तत्वे विसरून बलशाली होता येणार नाही. बहुजनसमाजाला आपला इतिहास षोधतांना हे अनमोल तत्व सोबत घ्यावे लागेल. डॉ. पंजाबराव हे अमर शिल्प आहे.

'शेतकरी' आणि 'शिवाजी' दोन्ही डॉ. पुजाबराव देशमुखांच्या जीवन कार्यातील स्फूर्तिस्थाने राहीलीत. त्यांच्या दोन जगप्रसिध्द संस्थांना त्यांनी वरील स्फूर्तिस्थांनाचीच नावे दीलीत 'भारत कृशक समाज' व श्री शिवाजी शिक्षण संस्था. भाऊसाहेबांनी पहिली संघटना 'वऱ्हाड शेतकरी संघ' या नावाने उभी राहिली. 'जागतीक कृषी प्रदर्शन' द्वारेही त्यांनी भारतीय कृषी व कृषक यांना जागतीक नकाशावर आणुन ठेवले. अखिल भारतीय शेतकरी सहकारी अधिकोशाची त्यांची योजना भारत सरकारने जुलै १९८२ साली 'राष्ट्रीय कृषी ग्रामीण विकास बॅक' स्थापून तडीस नेली. भाऊसाहेबभारतीय शेतकऱ्यांसाठी नसंपणारा हंगाम होय!सुगी होय ज्ञानाचे विज्ञान होय! शेतकरी शेतकरी म्हणत लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख शेतकऱ्यासोबत रमून गेले.भारताच्या उत्थानासाठी डॉ. पंजाबरावांनी जी रूपरेखा ठरवली ती आजही अमलात आणली जाते. यातच भाऊसाहेबांचा दुरदृष्टिकोण दिसून येतो. समाजसेवा, समाजप्रबोधन आणि समाज—विकास या उच्च भूमिकेंवरून डॉ. पंजाबराव कृतीशींल राहीले. 'कृषी हे साधन आणि कृशक हे साध्य असा भाऊसाहेबांचा क्रांतीसिध्दांत होता. भाऊसाहेब स्वत: शेतकरी कुटुंबातले होते. शिक्षणाकरीता त्यांना या गावावरूण त्या गावाला फीराव लागल म्हणुन त्यांनी वंचीत बहुजनांच्या मुलांकरीता खेडोपाळी शिक्षणाची व्यवस्था केली, बोर्डींग काढले.

कृषकांच्या प्रगतीतून पंजाबराव भारताची प्रगती मोजत होते. देशाला थोर करण्यासाठी कृषकांना थोर करीत होते. नांगराच्या फाळात सतत सुधारणा करीत पंजाबराव कृषक—क्रांतीला नवा आकार व नवा आयाम देत होते. नांगरटीच्या सरळ रेषेतुन आणि बाराखडीच्या बालबोधातुन त्यांची कृषक क्रांती प्रगत होत होती. कापसातून क्रांती, गव्हातून तत्वज्ञान, शिक्षणातून संसकृती, फळातून चारित्र्य, पैशातून प्रेम आणि समवृध्दी सभ्यता अशी त्यांची शेतकरी क्रांती होती. समाज काय पीकवितो, काय उपभागतो, काय शिकवतो—वाचतो यावर समाजाचे विचार आचार ठरतात. लहरी मान्सुनला आणि लहरी भांडवलदारांना शेतकरी क्रांतीच्या ज्ञान—विज्ञानाने पंजाबराव नमवू इच्छीत होते. काळया मातीला, भौळया शेतकऱ्यांना आणि हीरव्या रानांना स्पर्श करीत पंजाबरावांची कृशी क्रांती उंच उंच झेपावत होती. कृषी विद्यापीठातून 'कृषाक—विद्यापीठे' घडविण्याची त्यांची महत्वकांक्षा होती.

भाऊसाहेबांची दृष्टी केवळ पारदर्शीच नव्हे तर थेट भविष्याचा वेध घेणारी होती. देश, राष्ट्र, समाज असे मोठमोठे नुसतेच कर्णमधुर पण अव्यक्त अर्थाचे शब्द न वापरता त्यांनी शेतकरी समाज हा निश्चितपणे आपल्या डोळयापुढे ठेवला होता.डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे भारतातील कृषी क्षेत्रांशी संबंधीत असणारे एक अग्रगण्य व्यक्तीमत्व होते. त्यांचा मुळ पिंड कृषी क्षेत्राशी निगडीत होता आणि त्यामुळे जन्मत:च त्यांच्या अंत:करणाच्या विचारसरणीमध्ये कृषकांचे प्रश्न रूजल्या गेले. संविधान तयार होत असताना शेतकऱ्यांचे संसदेत तळमळीने प्रश्न मांडणारे सदस्य म्हणून त्यांना ओळखतात. आपल्या आयुष्यातील महत्वाचा कर्तृत्वाचा काळ हा शेतकरी आणि भारतातील शेतीला समर्पित केला. संपूर्ण भारतातील शेतकरी समवृध्द झाला पाहीजे, त्यांचे राहणीमान उंचावले पाहीजे, त्याच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या व दारिद्रयाचे निर्मुलन झाले पाहिजे, यासाठी त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न पुर्वलक्षी प्रभावाने जाणून घेण्यासाठी शेतकरी संघटनेची स्थापना केली. त्यांच्या कृषी क्षेत्रातील विचारांची ख्याती ऐतिहासिक आर्थिक विचारांशी सुसंगत आहे.

''भारतातील सर्व राज्यात दूरपर्यंत शेतकरी शेती करतात. त्यांचे संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून आहे. आपल्या अर्थव्यवस्थेचा शेती हा आत्मा आहे आणि कृषक हा जीव आहे. त्यामुळे भारतीयांची मूळ कर्मभूमी कृषीप्रधान आहे''असे त्यांचे स्पृष्ट मत होते. कृषी आणि कृषक भारतीय अर्थव्यवस्थेचे, समाजव्यवस्थेचे, शैक्षणिक विकासाचे व राजकीय स्थैर्याचे विकसित पंचप्राण किंबहुना आधारस्तंभ होय असा त्यांचा विचारातील गाभा आहे. भारतीय नियोजनामध्ये कृषी अंदाजपत्रकाला स्वतंत्र व अग्रगण्य दर्जाचे स्थान देण्यात आले पाहीजे व एंकदरित राष्ट्रीय उत्पन्नापैकी जास्तीत जास्त निधीची तरतुद कृषी विकासाच्या कार्यासाठी करण्यात आली पाहिजे, याच माध्यमातून भारतीय नियोजनाची सर्जनशीलता यशस्वी होईल, असे त्यांचे ठाम मत होते. भाऊसाहेब मूळात शेतकरी असल्यामुळे त्यांच्या विचाराचा पिंड सुध्दा शेतकरी जीवनातील दु:ख, दारिद्रयाने परिचीत होता. कारण अवती—भवतीचे काळाच्या ओघातील शेतकऱ्यांचे दैन्य, दारिद्रय, उपासमार, कृष्ट,अवहेलना, पिळवणुक ही त्यांनी प्रत्यक्षात अनुभवली होती, पहिली होती. त्यामुळे त्यांच्या विचारात शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीचे मार्मिक दर्शन घडते. त्याच दृष्टीने त्यांनी आपला विचारप्रवाह शेतकरी कल्याणाचे कायदे करण्यासाठी लोकसभा सदनामधून गंगेच्या प्रवाहाप्रमाणे निर्मळ, शुध्द विचारसरणीतून लोकप्रतिनिधींसमोर मांडल्याचे दिसून येते. ही बाब त्यांनी घटना समितीसमोर मांडलेल्या प्रस्तावातून तसेच प्रतिपादन केलेल्या विचारसरणीतून प्रत्ययास येते. त्यांची कृषी विषयक विचारसरणी अलीकडच्या काळामध्ये तंतोतंत लागू होणारी आहे. अलीकडे शेतकरी आत्महत्यांसारख्याा ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्याचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामीण भागात पायाभूत सुधारणा संस्थापित करण्यासाठी तसेच त्यांचे विचार रूजविणे क्रमप्राप्त आहे. ग्रामीण कृषकांचा विकास म्हणजेच देशाचा विकास हा त्यांच्या विचारधारेतील अभिप्राय होता.

भाऊसाहेबांचे क्रांतिकारक विचार

१) शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे.

२) शासकीय संस्थांमध्ये व नोकरीत त्यांच्यासाठी ८० प्रतिशत जागा राखून ठेवने.

३) शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा नाहीसा करणे.

४) विशिष्ट उत्पन्नाची वैगेरे अट न ठेवता प्रत्येक प्रौढाला मतदान अधिकार मिळायलाच हवा.

५) शेतकऱ्यांची बॅंक स्थापन केली जावी आणि तिच्या द्वारे शेतकऱ्यांना कमी व्याजाने लांब मुदतीची कर्जे देण्यात यावी.

६) देवस्थानच्या मालमत्तेचा उपयोग शिक्षणासाठी व रूग्णालये उघडण्यासाठी व्हावा.
७) लष्करी शिक्षण हे सक्तीचे केले जावे.
८) जमिनीची समान वाटनी व्हावी.
६ सरकारी अधिकारी व वकील वगैरेंच्या संपत्तीची योग्य तऱ्हेने मोजदाद करण्यात यावी.

शेतकऱ्यांचे अपार दु:ख—दारिद्र भाऊसाहेबांनी आजन्म अनुभवले होते. अज्ञान, दारिद्र व व्यसनांनी वेढलेल्या या विराट समाजाच्या मुक्तीची आत्यांतिक गरज त्यांना वाटत होती. या भुमिपूत्रांच्या दु:खाकडे सामाजीक महत्वाची आस्था म्हणून अजून कुणीच कसे बघीतले नाही याचे भाऊंना आश्चर्य वाटत होते. कृषिप्रधान देशात कृषकाची चाललेली ही अक्ष्यम उपेक्षा हीच आपल्या ऱ्हासाची कारणे होत. हे त्यांच्या पारदर्शि नजरेला कळत होत, आणि म्हणूनच त्याच्यासाठी काहीतरी केले पाहीजे ही कल्पना भाऊंना अस्वस्थ करीत होती.

भाऊसाहेबांच्या मते

‘ अन्याय करणाराइतकाच त्याला संमती देणारा, नि तो उघडया डोळयांनी पाहणारा दोषी असतो.’

भाऊसाहेबांचे आर्थिक विचार —

१४ डिसेंबर १९३० रोजी ‘म.प्र.विदर्भाचे मंत्री’ म्हणुन भाऊसाहेब मंत्री झाल्यावर व्हिलेज पंचायत बिल, सहकारी सोसाटयांना उत्तेजन, अस्पृष्यतानिवारण बिल, रोगप्रतिबंधक कायदा ही काही महत्वाची कार्ये केली. पण खरा कळस गाठला तो डॉ. भाऊसाहेबांनी आणलेल्या ‘

कर्ज लवाद’ कायद्यामुळे :—विदर्भ—मध्यप्रदेशाचा बहुतांशी शेतकरी सततच्या ओल्या—कोरडया दुष्काळांत भरडत असल्यामुळे त्याच्यावरील कर्जाचा डोंगर काही केल्या कमी होत नव्हता. कर्जापोटी गहाण टाकलेली शेती त्यामुळे सावकाराच्या घशात जाऊ लागली. मुद्दलापेक्षा दहा पट अधिक व्याज देऊनही आणि बापाचं कर्ज फेडण्यात मुलाचा जन्म खर्ची घालूनही केवळ १०० रू. कर्जापोटी शेतंच्या शेत सावकरी पाशात आवळू लागली. शेतसारा भरणे जिथे अवघड तिथे तो कर्जाचे हप्ते चुकवणार कसा ? आणि त्यातच जागतिक मंदीने शेतीमालाच्या भावाची अभूतपुर्व घसरण झाली आणि कर्जाचे डोंगर अधिकाधिक वाढू लागले.

पद्धतशीरपणे रचलेजा हा चक्रव्यूह भेदणे आवश्यक होते. अभिमन्यूची वाट होती. आणि भाऊसाहेबांच्या रूपाने तो चक्रव्युह भेदायला अभिमन्यू तत्पर होता. वास्तविक कायद्यामूळे वकील व सावकार यांचीच कुरणं कमी होणार होती आणि त्यांचे भक्ष्य बनलेल्या जनतेच्या दृष्टीने ते योग्य ही होत. पण झाल उलटच ज्यांच्या फायद्यासाठी झटायचे तेच विरोध करीत होते. म्हणून भाऊसाहेबांनी सभागृहात खेदाने उद्‌गार काढले होते.‘‘ आपला शेतकरी इतका भोळा आहे की पुषकळदा तो नकळत आपल्याच कल्याणाच्या विरोधात हात उगारतो’’ या बिलविरूद्ध काहूर माजंल. विसंवादी सूर काढणाऱ्या तारांचा प्रयत्नपूर्वक खच पाडला गेला. हे बिल घाईघाईने मंजूर करून घेतल्याने फार दूरगामी गंभीर परिणाम होतील समाजातील भावनात्मक ऐक्याला त्यामुळे तडे जातील. धनको व ऋणको संबंध बिघडतील करोडो रूपयांचा प्रश्न असल्याने त्यात धसमुसळेपणा उपयोगाचा नाही. असे सूर सभागृहात देखील हमरीतुमरीवर येऊन गुंजत होते. पण भाऊसाहेबांनी त्यांचे कार्य त्यांनी अविरत चालु ठेवले.डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांचे आर्थिक कल्याण करण्यासाठी आणि शोषण थांबविण्यासाठी कर्ज लवाद बिल कौन्सिलमध्ये मांडले होते. त्यामुळे २६ जाणेवारी १९३३ मध्ये या विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाले. या कायद्यामुळे कर्जाऊ रकमेवर कोणताही व्याज दर आकारण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला विकास घडवून आणला.

डॉ. पंजाबरावांच्या विचारसरणीनुसार

‘‘ गरिबी निर्मूलनाचा एकमेव प्रभावी मार्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास आणि कृषीतील प्रयोगात्मक बदल होय. या विकासामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. ही वाढ गरिबांपर्यंत जाऊन ‘झिरपते’ एकंदरीत लोकांचे राहणीमान वाढते. त्यांच्यामते जोपर्यंत शेतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, अद्यावत यंत्रसामुग्री आणि कुशल मनुष्यबळ यांचा वापर केला जात नाही. तोपर्यंत आपल्या देशातील ग्रामीण

विभागातील लघुउद्योगांना प्राध्यान दिल्या जाणार नाही. म्हणुन ग्रामीण विभागातील शेती आणि लघुउद्योगांकडे दुर्लक्ष केल्या जाऊ नये असे त्यांचे मत होते. ग्रामीण भागात निवास, पाणी, शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभुत गरजांकडे शासनाने लक्ष केंद्रीत करायला हव .महाकाय औद्योगिक विकासाकरीता प्रचंड भांडवल लागते. ही प्रक्रीया भांडवलप्रधान आहे. भारताला श्रमप्रधान तंत्राची आवश्यकता आहे. या तंत्राचा रोजगार निर्मितीसाठी आणि गरिबी कमी करण्यासाठी उपयोग होऊ शकतो. म्हणून. हे तंत्र अमलात आणण्यासाठी भारतीय शेतकऱ्यांच्या विकासाकडे सातत्याने शासनाने लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून विस्थापित अकुशल श्रमिकांना प्रशिक्षण देऊन सक्षम करणे महत्वाचे आहे. कृषी विकासातून गरिबी निर्मूलनाच्या योजना गरिबांपर्यंत पोहचू शकतात आणि भ्रष्ट राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना वाव राहत नाही. लोकांची क्रयशक्ती वाढते. भविष्यात केवळ आर्थिक सुधारणांच्या नावाखाली राजकीय प्रतिनिधी स्वार्थी होऊ शकतील असेही त्यांनी विधान केले होते. मध्यस्थ, पुढारी आणि अधिकारी गरिबांची फसवणूक करूण शेतकऱ्यांची फसवणूक करूणही पैसे लुबाडण्यांचे तंत्र अमलात आणत आहेत. गरिबीची समस्या या देशातील कृषीक्षेत्रासी निघडीत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. गरिबीची पाळेमुळे बुरसटलेली समाजरचना आणि विकृत मानसिकता यामध्ये खोलवर गेली आहेत. शेती हे फलदायी क्षेत्र असुन त्यात गुंतवणूक रूपात होणरा खर्च फायदेशीर होऊ शकतो.

पाणीपुरवठा योजना :—

चांगले दीवस म्हणजे चांगला विकास होय. चिरस्थायी विकास घडवून येण्याकरिता शुद्ध पाणीपुरवठा आवश्यक आहे. ग्रामीण विभागातील लोकांच्य पाणीपुरवठयाचा मुलभूत प्रश्न त्यांनी जील्हा कौंसिलचे अध्यक्ष असताना सोडविला होता. दि.५/८/१९२८ ला अमरावती, आसरा, दर्यापूर इ. गावांना पाणीपुरवठा करणारी योजना त्यांनी कार्यरत केली. त्याकरता त्यांनी जिल्हा कौंसिलच्या अंदाजपत्रकामध्ये ३५,६५०रू. तरतुद केली होती. तसेच जुन्या विहीरीच्या विकासाकरता १५,१०० रू. संकल्पीत खर्च करण्याचे ठरविले होते व हा प्रस्ताव पास करून पाणी पुरवठयाच्या सोयी गावागावामध्ये निर्माण केल्या.

सहकारी संस्था दुरूस्ती विधेयक

१९३१ पर्यंत अनेक कारणांमुळे शेतकरी कर्जाची फेड करू नशकल्यास त्याची गहाण शेती किंवा अन्य मालमत्ता जत्प करण्यात येत असे. त्याची शेती जप्त होवु नये म्हणून शेतकऱ्यांना कायद्याच्या आधारे संरक्षण देणे आवश्यक झाले होते. म्हणून मंत्री असताना सरकारी स्तरावर डॉ. पंजाबरांनी सहकारी संस्था दुरूस्ती विधेयक सभागृहात सादर केले. होते आणि शेतकऱ्यांची मालमत्ता जत्प करू नये या संदर्भात आपले विचार व्यक्त केले, तसेच मध्य प्रांत कॉटन मार्केट विधेयक बहुमताने मंजूर करून घेतले.

हिंदू देवस्थान संपत्ती विधेयकः—

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी १९३१ साली मध्य प्रांत वऱ्हाडच्या कायदे मंडळासमोर 'हिंदू देवस्थान संपत्ती बिल' आणून आपले विचार मांडले. देवस्थानची संपत्ती सरकारणे ताब्यात घेऊन त्यातून देवस्थानची नीट व्यवस्था चालवावी व उर्वरीत संपत्तीचा उपयोग जनतेच्या शैक्षणिक कार्यासाठी करावा या उद्देशाने त्यांनी प्रस्तुत बिल सादर केले होते. एक पैसा कर न लावता सुद्धा विनामुल्य शिक्षण देता येते ही बाब डॉ. पंजाबरावानी आकडेवारीसह सरकारच्या लक्षात आणून दिली होती. परंतु विरोधकांनी भोळयाभाबडया जनतेला भडकविले आणि बिल नामंजूर झाले. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृश्टिकोनातून देशाची आर्थिक धोरणे कशी असावीत त्याचे नियोजन कसे करायला पाहिजे या संदर्भात त्यांनी देवस्थान बिल मांडले होते. जितक्या लवकर आणि जितकी जास्त संस्थानांची प्रचंड संपत्ती आपण देश हितासाठी वापरू तितका आपल्या देशाचा अधिक वेगाने विकास घडून येईल.

मध्यप्रांत खेडे पंचायत बिल १९३३ :—

ग्रामीण भागाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ग्रामपंचायतीचा कारभार परिणामकारक रीतीने चालावा म्हणून त्यांनी कौन्सिलमध्ये खेडे पंचायत बिल करून घेतले. या दुरूस्ती विधेयकांमुळे ग्रामीण पंचायती सबळ होऊन ग्राम सुधारणेकडे अधिक जागरूकपणे लक्ष देऊ शकल्या. ग्रामीण भागाच्या सुधारणांसाठी हे बिल उपयुक्त सिद्ध झाले.

ग्रामीण विकास आणि खेडे पंचायत बिल :—

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होण्याकरिता डॉ. पंजाबराव यांनी घटना समितीचे सदस्य असतांना खेडे पंचायत बिलांवर आपले मत प्रतिपादीत केले होत. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी आणि पुननिर्माण ह्य गांधीवादी विचारांना बल देण्याचा प्रयत्न आपल्या विचारातून केला. जर भारतीय अर्थव्यवस्थेचा तळागाळातून विकास करायवाचा असेल आणि विकासाच्या खालच्या पातळीवर असलेल्या लोकांना नियोजित धोरणंची फलश्रृती प्राप्त करून द्यावयाची असेल तर ग्रामीण विकास होणे आवशक आहे. त्या शिवाय ग्रामीण भूमीहीन श्रमीकांची गरिबी दूर होणार नाही. ग्रामीण विकास सर्व प्रकारच्या आर्थिक, औद्योगिक आणि कृषी विकासाची गुरूकील्ली आहे. ग्रामीण विकासाचे कार्य विविध योजनेच्या माध्यमातून राज्यांच्या मुख्यालयापर्यंत पोहोचविणे जसे आवशक आहे. तसेच राज्याच्या मुख्यालयाद्वारे तालुका, जिल्हा आणि ग्रामीण विभागातील लोकांचा सहभाग हा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून साध्य करता येतो असे त्यांचे मत होते.

मध्य प्रांत कृषिमुक्ती विधेयक १९३१ :—

कर्ज लवाद बिल शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी मांडले होते. या कर्ज लवाद कायद्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे व सावकरी गळफासातून सुटण्याचे साधन उपलब्ध झाले. त्यानंतर सावकार अवाजवी व्याज लावून कर्जदारांच्या जमीनी हडप करीत होते. या प्रकाराला पायबंद घालण्यासाठी मध्य प्रांत कृषक मुक्ती विधेयक सन १९३३ मध्ये मांडले होते.ग्रामपंचायत पाया हाच देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा मापदंड आहे. गावात राहणाऱ्या लोकांना योग्य प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देणे आवशक आहे. गावाची स्वच्छता, विद्युत, पाणी, आरोग्य, व्यवस्था, प्राथमिक शिक्षण, वृक्षारोपण, वाचनालय, मनोरंजन, सार्वजनिक वितरण प्रणाली, सिंचन व्यवस्था, लघु उद्योग, कृषी, मत्स आणि पशुपालन इत्यादी विकासाच्या योजना ग्रामीण विभागातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पंचायती स्वरूपाची व्यवस्था ग्रामीण सतरावर केल्या जावी असे डॉ. पंजाबरावाचे मत होते. ग्रामीण विकासाचे अंदाजपत्रक तयार करणे सहज शक्य होईल. याकरिता ग्रामपंचायत बिल त्यांनी संसदेमध्ये मांडले होते. पंचायतीच्या अर्थसंकल्पात स्त्रीयांसाठी तरतूद आणि साधनांवरील खर्च यांचे समायोजन करायला पाहिजे असे त्यांचे मत होते. पंचायत पातळीवर कृषकांच्या आर्थिक कल्याणाच्या दृष्टिकोणातुन अर्थसंकल्पांचा विचार केल्या गेला पाहिजे. महिला शेतकरीवर्गाला प्राधान्य देण्यात यावे. लिंगभेदानूसार विचार करतांना या देशातील ग्रामपातळीवर योजनानिहाय, क्षेत्रनिहाय आणि वर्षनिहाय विश्लेशण करून अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारीत अंदाज आणि प्रत्यक्ष खर्च या सर्वांचा आढावा घेतला पाहीजे.

भारत सरकाने त्यासाठी स्त्रीयांच्या परिस्थितीची माहिती करून घेण्यसाठी आर्थिक पाहणी करावी. त्यानुसार स्त्रीयांसाठी राज्य शासनाची धोरणे अंमलात आणावी आणि प्रत्येक मंत्रालयाने स्त्रीयांच्या विशिष्ट गरजांसाठी वेगवेळया निधीची तरतुद करावी असे त्यांनी मत व्यक्त केले होते. ग्रामीण भागात महिलासाठी कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम अंमलात आणावे आणि या कार्यक्रमांद्वारे सर्व योजनांबाबत विस्तृत माहिती महिलांना देण्यात यायला पाहीजे. त्यांच्यासाठी अर्थसंकल्प तयार करतांना कार्यक्रमांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी पंचायत पातळीवरून करण्यात यावी . स्त्रीयांना गुणात्मक प्रजोउत्पादनाबाबत आरोग्यसेवा सुधारीत स्वरूपात उपलब्ध करूण देण्यात यायला पाहिजे तरूण मुलींना आरोग्य विषयक प्रशिृषण देण्यात यावे. त्यावर लोकसंख्येचे स्थिरीकरण व स्त्रीयांचे सबलीकरण अवलंबून असते. अशा प्रकारची धोरणे अर्थसंकल्पांमध्ये समाविष्ट केल्यास स्त्री, पुरूष, श्रीमंत, गरीब यांच्यातील आर्थिक विृषमता कमी करणे षक्य होते. असा डॉ. पंजाबरावांचा शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाच्या दुरगामी विचार होता.

सरांश :—

शेती हा ग्रामीण व आर्थिक विकासाचा मुख्य घटक आहे. स्थलांतराला प्रतिबध. शेतीसंबंधी पूरक उद्योगांची पायाभूत उभारणी करायला पाहीजे. काळा पैशाचा शेती विकासाकरिता उपयोग करावा. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विकासां संदर्भात देशातील जमीनदारी, मालगुजारी व सावकारी इ. ची सांख्याकीय आकडेवारीने संशोधन करावे. सावकारांच्या व जमीनदारांच्या शोषणातून शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी ग्रामीण भागात वित्तपुरवठा करणाऱ्या अधिकोषाची स्थापना करण्यात यावी. कृषी शिक्षणाला कृती शिक्षणाची जोड. कृषी कल्याण अधिकाऱ्याची नियुक्ती, जलसिंचनाच्या सोयीत वाढ. सहकारी विपणनाची शिफारस .

भाऊसाहेबांची दुरदृष्टी कमालीची होती. आज ज्या समस्यां अर्थव्यवस्थेत भेडसावतात त्या निवारण्याचे उपाय त्यांनी आधीच मांडुन ठेवले दृष्टे समाजसुधारक व अर्थशास्त्रज्ञ होते भाऊसाहेब. अशा लोकनेत्यास त्यांच्या पुण्यतीथी निमित्त्य विनम्र अभिवदन.....

संदर्भ ग्रथ सूची

१) मोहीते विर उत्तमराव'' जागतिक कृषिक्रांतीचा विधाता'', प्रा. सौ. भाग्यरेखा देशमुख पब्लिशर्स अमरावती १९६६

२) देशमुख कल्पना '' डॉ. पुजाबराव देशमुख यांचे सामाजीक योगदान'' प्रदिप मुळे, पब्लिकेशर्स, नागपूर १९९७

३) पवार ना. ग. '' महामानव डॉ. पंजाबराव देशमुख'' भरती प्रकाशन पुणे.१९९३

४) डॉ. सावरकर सुभाश '' लोकमहर्शी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ'' महाराष्ट्र राज्य साहीत्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

५) प्रा. डॉ. ढाले रविंद्र '' डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार'' नभ प्रकाशन अमरावती २००९

६) प्रा. रघुनाथ कडवे '' भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख '' मयूर आर्टस, गणेश पेठ नागपूर.